केंद्र शासनाच्या वन बंधू कल्याण योजनेंतर्गत सन २०१४-१५ अंतर्गत प्राप्त केंद्र सहाय्य वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१५/प्र.क्र.०८ /कार्यासन.६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख:- ११ डिसेंबर, २०१५.

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८२/अर्थ-३, दि.३०.३.२०१५.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.४.२०१५.
३) आदिवासी विकास विभाग, पत्र क्र. केंद्रीय- २०१५ / प्र.क्र. ७९/ का-१९, दि.१५.१०.२०१५.
४) केंद्र शासन पत्र क्रमांक F.No. 17014 / 07 /2014-SG-II, दिनांक ३०.१२.२०१४.
५) केंद्र शासन पत्र क्रमांक F.No. 17014 / 07 /2014-SG-II, दिनांक २६.०२.२०१५.
६) आदिवासी विकास विभागाची नस्ती क्र. केंद्रीय - २०१५ / प्र.क्र. ७३ / कार्या- १९.

**शासन निर्णय-**

मागणी क्र. टी-५, मुख्य लेखाशिर्ष २२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गियांचे कल्याण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०२- अनुसूचित जमातीचे कल्याण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनाअंतर्गत योजना **( ०१) (५८) वन बंधू कल्याण योजना ( केंद्रीय ), ३१ सहायक अनुदाने- २२२५ डी ७०७ या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ या वर्षात रू.१०००.०० लक्ष निधी अर्थसंकल्पित** आहे. वनबंधू कल्याण योजनेखाली सन २०१४-१५ या वर्षात प्राप्त रू.१०००.०० लक्ष निधी सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पित निधीतून वितरीत करण्यास वित्त विभागाने वाचा येथील क्र.६ मधील नस्तीत सहमती दिलेली आहे. यानूसार वन बंधू कल्याण योजना ( केंद्रीय ), ३१ सहायक अनुदाने- २२२५ डी ७०७ या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ या वर्षात रू.१०००.०० लक्ष अर्थसंकल्पित निधीतून **रू.१०००.०० लक्ष (रू.दहा कोटी फक्त)** निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. सदर वितरीत रु. १०००.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (BEAMS) खर्चासाठी नियंत्रक अधिकारी, आयुक्त, आदिवासी विकास यांना खर्च करण्यासाठी सुपूर्द करण्यात येत आहे. नियंत्रक अधिकारी यांनी वितरित निधीच्या मर्यादेत खर्च करण्याची दक्षता घ्यावी.

४. उपरोक्त आदेश वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्र. ३२२/व्यय-१४, दिनांक २७-११-२०१५ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२१०१७१२०४२२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhagwan Maruti Sawant

Digitally signed by Bhagwan Maruti Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhagwan Maruti Sawant
Date: 2015.12.11 16:08:38 +05'30'

**भगवान सावंत**
कार्यासन अधिकारी.

**प्रत,**

१. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
२. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
३. जिल्हाधिकारी, नंदूरबार.
४. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, तळोदा.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक / नंदूरबार.
६. वित्त विभाग ( बजेट ) / नियोजन विभाग ( बजेट) , मंत्रालय, मुंबई-३२
७. कार्यासन अधिकारी, कार्यासन-१९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.